जिल्हा परिषद, अमरावती

बांधकाम विभाग, कॅम्प परिसर अमरावती ४४४६०२

खुली निविदा ओपन टेंडर सुचना क्रमांक-८ **(इलेक्ट्रीक)** सन २०२६-२०२७ (पहिली वेळ) (खुली निविदा)

मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अमरावती यांच्या वतीने कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,जिल्हा परिषद,अमरावती हे खालील कामांच्या निविदा ब -१ टक्केवारी प्रपत्रामध्ये जिल्हा परिषद पंजीकृत कंत्राटदारांकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन मागविण्यात येत आहे.

सदर निविदा दि . १५/०९ /२०२६ रोजी सकाळी १०.०० पासुन नोटीस बोर्डवर पाहण्यास उपलब्ध होईल.

| Sr. No. | Name of Work | Amount put to Tender (Rs.) | Tender Fee | EMD | Head. | Class of Contractor | Time Limit of Calender Months |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.क्षेत्र जगदंबा देवी संस्थान मु-हादेवी ता.अंजनगाव सुर्जी येथे विद्युतीकरण,आग प्रतिबंधक उपाययोजना ,सोलार एनर्जी सिस्टिम बसविणे ता. अंजनगांव सुर्जी | 769803 | 590 | 7700 | २५१५२५६६-(ब वर्ग) | CLASS VI AND ABOVE | 6 month |
| २ | प्राथमिक आरोग्य केंन्द्र नेरपिंगळाई येथे इलेक्ट्रीक फिटींग करणे ता.मोर्शी | 457540 | 590 | 4600 | 2210 आय 192 | CLASS VII AND ABOVE | 6 month |

खुली- निविदा पध्दतीचा तपशिल

| खूली - निविदा प्रसिध्दी | दिनांक -१५/०९ /२०२६ |
|---|---|
| खूली - निविदा दस्ताऐवज स्विकारणे प्रारंभ करण्याचा दिनांक (Start) | दिनांक १५/०९ /२०२६ ते २२ /०९/२०२६ |
| खूली - निविदा दस्ताऐवज स्विकारणे समाप्तीचा दिनांक (End) | दिनांक - २२/०९ /२०२६ चे दुपारी ५.४५ वाजेपर्यत. कार्यकारी अभियंता ,जि.प. बांधकाम विभाग ,अमरावती यांचे कक्षात संबंधीत निविदा धारकांचे समक्ष दिनांक - २२/०९ /२०२६ रोजी दुपारी ५.४५ वाजेपासुन लिफाफ क्रमांक - १ उघडण्यात येईल शक्य झाल्यास |

## बांधकाम विभाग , जिल्हा परिषद , अमरावती

## खुली निविदा ओपन टेंडर सुचना क्रमांक- ८ (इलेक्ट्रीक)

## सन २०२६-२०२७ दि १५/०९ /२०२६

## (पहिली वेळ)

## अटी व शर्ती

## लिफाफा क्रमांक ०१

१. १) महाराष्ट्र शासनाचे ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०१६/प्र.क्र.१४८/यो-९ दिनांक ०२.१२.२०१६ मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे वर्गवारीनुसार यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द जिल्हा परिषद पंजीकृत कंत्राटदार (इलेक्ट्रीक) चे योग्य त्या वर्गवारीचे पंजीकरन केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

२) महाराष्ट्र शासन उद्योग ,उर्जा व कामगार विभाग चे अनुज्ञाप्ती पंजीकरण असल्याबाबतचे प्रमाणपत्र

३) आयकर विवरण पत्राची स्वाक्षाकींत प्रत ( मागील ३ वर्षाचे )

४) व्यवसाय कर प्रमाणपत्र

५) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

६) निविदा चालन पावती

(७) १ %टक्के बयाना (EMD) रक्मेचा धनाकर्ष (डि.डि)

८)कंत्राटदार यांनी लिफाफा क्र.१ व २ या वर कामाचे नाव व कंत्राटदार नाव स्पष्ट लिहावे .

वरील अनु.क्र.१ ते ७ ची कागदपत्रे लहान लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. लिफाफा क्र.१ मध्ये अपुर्ण वरील प्रमाणे दस्ताऐवज सादर न करणा-या कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना दिली जाणार नाही किंवा पुनच्छ कमी असलेले दस्ताऐवज मागीतले जाणार नाही यांची नोंद घ्यावी . लिफाफा क्रमांक १ मध्ये जे कंत्राटदार कागदपत्रे कमी असल्याकारणाने अपात्र झाले त्यांचा लिफाफ क्र.२ उघण्यात येणार नाही .

## लिफाफा क्रमांक ०२

## कंत्राटदार यांनी दरनमुद केलेले बुकलेट

२. पाकीट क्र.१ मधील कागदपत्राची पुर्तता झाल्याशिवाय आर्थिक लिफाफ (दराचा लिफाफा) उघडले जाणार नाही.

३. यशस्वी निविदा धारकास संपुर्ण काम करणे स्वत बंधनकारक राहील. उप कंत्राटदाराची ( Sub Contractor ) नेमणुक करता येणार नाही.

४. देयकाची अदायगी करतांना नियमानुसार आवश्यक कपाती करण्यात येतील त्यास कंत्राटदाराची हरकत राहणार नाही.

५. कामाचे तांत्रीक निकष सोबत जोडलेल्या Annexure-I मध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.

६. जि.प.कडुन कोणतेही बांधकाम साहित्य उदा. लोखंड व सिमेंट पाईप पुरविण्यात येणार नाही. कंत्राटदारानी असे साहित्य कामावर वापरल्यास सदर साहित्य आय.एस.आय. मार्कचे असल्याबाबतचे व देयकासोबत साहित्याचा चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

७. निविदा मंजूर झाल्यानंतर १% सुरक्षा ठेव विहित मुदतीत भरावी लागेल. तसेच कार्यालयाने सुचविल्यानुसार विहीत रकमेचा स्टॅम्प पेपर करारनामा करण्याकरिता निविदा उघडल्यानंतर सादर करावा लागेल तसेच कामाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर कामाचा विमा १% विमा संचालनालय मुंबई यांचे कडुन काढावा लागेल. अन्यथा कामाचे किंमतीचे अनुषंगाने १% रक्कम कंत्राटदाराचे प्रथम देयकातुन कामाचा व कामगाराचा विमा म्हणुन पुर्ण रककम वसुल करुन विमा संचालनालय मुंबई यांचेकडे डिमांड ड्राफ्टद्वारे पाठविण्यात येईल.

८. निधी उपलब्धतेनुसार देयकाचे शोधन करण्यात येईल.

९. कोणतेही कारण न दाखविता निविदेतील एखादी बाब किंवा पुर्ण खुली-निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती यांचे परवानगीने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. अमरावती यांनी राखुन ठेवलेला आहे.

१०. निविदेतील दर हे जी.एस.टी. (GST) वगळुन आहेत. व कंत्राटदारास नियमानुसार जी.एस.टी. (GST) देय राहील.

११. कामावरील मजुराचा विमा उतरविण्याची जबाबदारी संबधित कंत्राटदारची राहील .कामाबाबत संबधीत कार्यालय प्रमुखांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे लागेल.

१२.वरील कामाची निविदा प्रक्रिया खुली-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहे. या निविदेसंबधी या पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रक इत्यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

१४.खुली-निविदा प्रणाली अंतर्गत विकास कामाची निविदा भरतांना कंत्राटदाराने १% बयाना रक्कमेचा धनाकर्ष मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जि.प. अमरावती यांचे नावे लिफाफा क्रमांक ०१ मध्ये सादर करावा तसेच निविदा फी चा भरणा मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जि.प. अमरावती यांचे खाती जमा करुन, भरणा केल्याची पावती कार्यालयामध्ये सादर केल्यानंतर निविदा पुस्तीका देण्यात येईल. सु.बे.अ./ कंत्राटदाराना सुध्दा बयाना रक्कम लेखा संहीता १९६८ चे नियम १४१ नुसार भरावी लागेल.

१५.वरील कामाच्या निविदा भरण्याचा दिनांक दि. / /२०२६ ला सकाळी १०.०० वाजेपासुन ते दिनांक- / /२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.

१६.सदर अटी व शर्ती मधील शर्त क्रमाक १ मधील नमुद केलेल्या कागदपत्राच्या प्रती तांत्रीक लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

१७.सदर कागदपत्रे निविदा सुचनेनुसार पुर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरवीली जाईल.

१८.पुर्ण माहीती भरलेले तांत्रीक लिफाफा क्र.०१ दिनांक दि. / /२०२६ सायं. ११.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, या कार्यालयामध्ये उघडल्या जातील.

१९.कोणतीही निविदा अटीच्या अधीन राहुन स्विकारल्या जाणार नाही.

२०.कामाचे ठिकाणी जिवित तथा वित्तीय हानी झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

२१. संबंधीत निविदा धारकांचा लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराचा निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर त्या निविदाकाराने निविदाधीन किंमतीच्या १% एवढया रक्कमेचा बँक प्रतिभूती (Bank Guarantee) किंवा धनाकर्ष (Demand Draft) अॅडीशनल परफॉर्मन्स सिक्युरीटी डिपॉझीट म्हणून आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग, अमरावती येथे सादर करावे. कोणत्याही कारणासाठी ८ दिवसांची मुदत शिथिलक्षम राहणार नाही. (उदा १ % ते १० % कमी दर - १% रक्कम).

२२.तसेच शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ मधील मुद्दा क्र. ३ प्रमाणे देकार १५ टक्के पेक्षा अधिकच्या कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम डी. डी. द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. १९ टक्के कमी दरासाठी पुढीलप्रमाणे पृथ:करण राहील, i) १० टक्के कमी दरापर्यत १ टक्के व ii) १५ टक्के कमी दरापर्यंत - (१५ टक्के - १० टक्के = ५ टक्के) तसेच iii) (१९-१५=४ टक्के करिता (४x२=) ८ टक्के असे एकूण (१+५+८) = १४ टक्के रक्कम संबंधीत निविदा धारकांचा लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L१ निविदाकारास धनाकर्ष (Demand Draft) अॅडीशनल परफॉर्मन्स सिक्युरीटी डिपॉझीट म्हणून आठ दिवसांच्या आत कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग, अमरावती येथे सादर करावी लागेल. सदर बाब उदाहरणादाखल देण्यात आली असून १९ टक्केच्या वर कमी दराचा देकार सादर केल्यास त्या प्रमाणे डी.डी. सादर करावे लागेल. डीडी सादर करण्यासाठी ८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथिलक्षम राहणार नाही.

२३.प्रथम न्यूनतम देकाराच्या (L१) निविदाकाराने विहीत मुदतीत Additional Performance Security Deposit चा भरणा केला नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L२) निविदाकारास लेखी विचारणा करुन ते L१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अति.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद अमरावती | कार्यकारी अभियंता<br>बांधकाम विभाग जि.प.अमरावती |